चिचिबाबाचे भाऊ



लेखक - डी पी सेन गुप्ता
चित्रे - गुज्जर
अनुवाद - मानसी महाजन



चिचिबाबाचे भाऊ

लेखक - डी पी सेन गुप्ता

चित्रे - गुज्जर

अनुवाद - मानसी महाजन



Grateful acknowledgement to

Professor G. Anandalingam
Professor Sanjay Biswas
Members of my family
And many other friends
For their help and
Encouragement.

DPS

कारगिल मध्ये अनाथ झालेल्या भारत आणि पाकिस्तान मधील सर्व मुलांना समर्पित.



अनंत जगांच्या किनाऱ्यावर मुले भेटतात.
वर स्तब्ध आकाश
आणि खवळलेलं अशांत पाणी.
अनंत जगांच्या किनाऱ्यावर
मुले नाचत बागडत भेटतात.

-टागोर

चिचिबाबा नावाच्या दूर देशात दोन भाऊ राहत होते. एकाचं नाव होतं गुरुक, आणि दुसऱ्याचं तुरुक. दोघांचं एकमेकांवर खूप प्रेम होतं. फक्त एकाच बाबतीत त्यांची भांडणे व्हायची. गुरुक होता उजवा-खुरा आणि तुरुक होता डावखुरा.

गुरुक उजव्या हाताने जेवायचा, आणि उजव्याच हाताने लिहायचा.
तुरुक डाव्या हाताने जेवायचा, आणि डाव्याच हाताने लिहायचा.



गुरुकला वाटायचं तो बरोबर आहे, आणि तुरुक चुकीचं वागतो आहे.
तुरुकला वाटायचं तो बरोबर आहे, आणि गुरुक चुकीचं वागतो आहे.



कोण बरोबर, कोण चूक यावरून त्यांची वादावादी व्हायची आणि वादातून मारामारी व्हायची.

गुरुक तुरुक ला उजव्या हाताने ठोसा द्यायचा आणि तुरुक गुरुकला डाव्या हाताने बुक्के मारायचा.

पण त्यांची भांडणं लगेच मिटत सुद्धा.

गुरुक आपला उजवा हात
तुरुकच्या गळ्यात टाके,
तुरुक आपला डावा हात
गुरुकच्या गळ्यात घाले
आणि दोघे हसत,
बोलत हिंडायला निघून
जात.



वर्ष सरली. गुरुक आणि तुरुक मोठे झाले आणि देशावर राज्य करू लागले. त्यांच्यात अजूनही भांडणे, वाद होत, पण त्यांचे एकमेकांवर प्रेम होते. त्यांच्या राज्यात इतरही उजवी-खुरी आणि डावखुरी माणसे होती. गुरुक आणि तुरुक भांडू लागले की ही माणसे सुद्धा आपापसात भांडू लागत.



एके दिवशी दोघांमध्ये खूप कडाक्याचे भांडण झाले. त्या दिवशी टॉमटॉम नावाचा एक दुष्ट कपटी माणूस त्यांच्या राज्यात भेटीला आला होता. टॉमटॉम म्हणाला, "तुम्ही एकमेकांपासून वेगळं राहिलेलंच बरं!"

त्याबरोबर त्यांच्या राज्याचे दोन तुकडे केले गेले आणि मध्ये एक भिंत बांधली गेली. दोन्ही भाऊ वेगळे झाले.



गुरुकच्या राज्याचे नाव पडले चिनचिन आणि तुरुकच्या राज्याचे नाव पडले चिनचुन. सर्व उजवी-खुरी माणसे चिनचिन मध्ये राहू लागली, आणि सर्व डावखुरी माणसे चिनचुन मध्ये. त्यांचे परिवार वाढत गेले तसे उजव्या-खुऱ्या माणसांच्या कुटुंबांमध्ये डावखुऱ्यांचा जन्म झाला, आणि डावखुऱ्या माणसांच्या कुटुंबांमध्ये उजव्या-खुर्यांचाही जन्म झाला.



टॉमटॉम अधून मधून चिनचिन आणि चिनचुन, दोनही राज्यांना भेट द्यायचा.
"तुरुक पासून जरा जपून राहा," टॉमटॉम गुरुकला बजावायचा.

"तुझ्या रक्षणासाठी मी तुला उजव्या हाताने चालवण्याची अशी खास गलोल देतो." असे म्हणून टॉमटॉमने गुरुक कडून गलोलीसाठी बरेच पैसे उकळले.



"गुरुक पासून सावध राहा!"
टॉमटॉम तुरुकला सांगे.

"तुझ्या रक्षणासाठी मी तुला
खास अशी डाव्या हाताने
चालवायची गलोल देतो." असे
म्हणून त्याने तुरुक
कडूनसुद्धा बरेच पैसे उकळले.



आपल्याला सर्वांना माहित आहे, उजव्या हाताने चालवण्याच्या आणि डाव्या हाताने चालवण्याच्या गलोलीत काहीही फरक नसतो. दोन्ही अगदी सारख्या असतात.



आपल्याकडे गलोल आहे याचा थोडा माज करावा म्हणून गुरुक भिंतीजवळ जाऊन तुरुकला गलोल दाखवू लागला. तुरुकने न पाहिल्यासारखं केलं आणि स्वतःकडची गलोल गुरुकला दिसेल अशी धरली.



कोण्या एका राज्यात सॅमसम नावाचा शस्त्र तयार करणारा इसम राहत होता. त्याने मोठ-मोठे दगड टाकता येतील अशी अजस्र गलोल गुरुकला विकली. या गलोलीतून सोडलेल्या दगडांनी घरे सुद्धा पडू शकणार होती.



गुरुक फार खुश झाला.
तो आनंदात बसून हुक्का ओढू लागला.
हुक्क्याच्या बुडबुड्यांमधून जणू गाणंच ऐकू येऊ लागलं!

"गुरक, गुरुक, थोर,
तुरुक एक चोर. "




तुरुकला हे गाणं ऐकू आलं. तो चिडला आणि टॉमटॉमकडे गेला.
टॉमटॉमने एक नवीन शस्त्र तयार केलं होतं. या शस्त्राचं नाव होतं - "तोफ"!

तोफेमध्ये दारुगोळा भरून, त्यासमोर मोठ्ठा लोखंडी गोळा ठेवायचा. दारूला आग लावताच स्फोट होई, आणि लोखंडी गोळा लांब फेकला जाई.

"हे शस्त्र अनेक घरे उध्वस्त करू शकते, अनेक माणसे मारू शकते." टॉमटॉमने हमी दिली.
तुरुकने टॉमटॉमला खूप पैसे देऊन 'तोफ' विकत घेतली.







दोन राज्यांमधल्या भिंतीजवळ तुरुकने तोफ ठेवली. तोफेचे तोंड गुरुकच्या घराकडे रोखले.

गुरुकला ऐकू जाईल अश्या आवाजात तुरुक गाणं गाऊ लागला.

"मीच राजा, मीच राजा, वाजवा तुम्ही ढोल.
"माझ्याकडे तोफ आणि गुरुककडे गलोल!"




गुरुकने तुरुकचं गाणं ऐकलं. त्याला तोफ म्हणजे काय हे ठाऊक नव्हतं. तो ताबडतोब सॅमसमकडे गेला. सॅमसमने त्याला अजून मोठी तोफ दिली आणि ही तोफ खूप घरे आणि माणसे उध्वस्त करेल याची हमी दिली. गुरुकने बरेच पैसे देऊन ती मोठी तोफ विकत घेतली.




पुढे दिवसेंदिवस असंच सुरु राहिलं.
गुरुक आणि तुरुक, एकमेकांवर कधी काळी खूप प्रेम करणारे भाऊ, आता एकमेकांचा तिरस्कार करू लागले.




त्यांची राज्ये विभागणाऱ्या भिंतीजवळ आता एकमेकांवर रोखलेल्या तोफा, बंदुका आणि शस्त्र दिसू लागली. गणवेश घातलेले उजवे-खुरे आणि डावखुरे सैनिक भिंतीच्या दोन्ही बाजूंनी सज्ज दिसू लागले.



शस्त्रे, गणवेश आणि सैनिकांचे पगार यासाठी भरमसाठ पैसा खर्च होऊ लागला.
गुरुक आणि तुरुक जसे गरीब होऊ लागले, तसे टॉमटॉम आणि सॅमसम श्रीमंत होऊ लागले.







चिनचिन आणि चिनचुन विभागणाऱ्या भिंतीला एके ठिकाणी मोठं भगदाड पडलं होतं.

मोठ्या माणसांचं लक्ष नाही असं बघून दोन्ही बाजूची लहान मुलं एकमेकांबरोबर खेळायला त्या भगदाडातून ये जा करत.

मुलांना अजिबात कल्पना नव्हती, पण चिनचिन आणि चिनचुनच्या शास्त्रज्ञांनी टॉमटॉम आणि सॅमसमकडून संपूर्ण राज्य भस्मसात करू शकतील असे महाविनाशक बॉम्ब तयार करण्याचं प्रशिक्षण घेऊन तसे बॉम्ब तयार केले होते.



गुरुकने त्याच्या प्रजेला सांगितलं, "हा बॉम्ब चिनचुन वर पडताच तिथले सगळे लोक मरून जातील. एवढी उष्णता तयार होईल, की पृथ्वी लोण्याप्रमाणे वितळू लागेल."

"भले शाब्बास!" चिनचिनचे लोक चित्कारले.

तुरुकने त्याच्या प्रजेला सांगितलं, "हा बॉम्ब चिनचिन वर पडताच सगळं वितळून जाईल. सगळे लोक मरतील आणि आपल्याला त्रास देणारे हे उजवे-खुरे लोक नामशेष होतील. अनेक वर्ष तिथे साधं गवत सुद्धा उगवणार नाही."

"भले शाब्बास!" चिनचुनचे लोक चित्कारले.



मुलांना हे काहीच समजत नव्हतं.

संध्याकाळी चिनचिन आणि चिनचुन, दोन्ही राज्यातली मुलं भिंतीतल्या भगदाडाजवळ जमली. चिनचिनच्या मुलांनी आपले उजवे हात पुढे करून चिनचुनच्या मुलांचे डावे हात धरले.

मुलांना भीती वाटत होती. लोण्यासारखे वितळणे म्हणजे काय हे त्यांना माहित नव्हते.



"आपण वितळलो, तर आपल्याला हात उरणार नाहीत, आणि मग उजव्या-डाव्याचा भेदच उरणार नाही. आपण सगळे समान होऊ!" चिनचिन मधला किंग्शुक म्हणाला.


"अरे, पण आपण सगळे मरून गेलेले असू." चिनचुन मधली रुक्मा म्हणाली.

"तसेही आपण मरणारच आहोत. मी तर दोन दिवस उपाशी आहे." एक लहान मुलगा म्हणाला. तो चिनचिन मधला होता का चिनचुन मधला हे कोणालाच ठाऊक नव्हतं.



गुरुक आणि तुरुकला आपल्या घरांच्या खिडक्यांमधून मुलांचा जमाव दिसला. मुलांना पकडायला सैनिक धावले, पण दोन्ही भावांनी सैनिकांना थांबवले.

दोघे भाऊ घरातून बाहेर आले, आणि भिंतीच्या दोन्ही बाजूंना, भगदाडाजवळ उभे राहून एकमेकांकडे पाहू लागले.



अनेक वर्षांनी ते एकमेकांना पाहत होते.
एकमेकांकडे बघताना त्यांना जुने दिवस आठवले. ते एकत्र राहायचे, एकमेकांवर प्रेम करायचे ते दिवस.
"हे आपण काय करून बसलो!" दोघांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले.
गुरुक आणि तुरुकने हात पसरून एकमेकांना कवेत घेतलं.
"सगळी हत्यारं, शस्त्र टाकून देऊ, आणि पूर्वीसारखे एकमेकांबरोबर राहू," त्यांनी ठरवलं.




मुलांचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. आधी मुलं घाबरली, पण दोन्ही भावांना एकत्र आलेले पाहून हसू लागली, मोठ्यानी, मोकळेपणानी हसू लागली.
दोन्ही बाजूचे लोक सुद्धा हसू लागले आणि....

हातात घेऊन हात
जवळ आली मुले.
नाचू लागली गाऊ लागली
हसू लागली मुले.



छोटे मोठे सर्वचि जमले
हसत गाऊनि नाचू लागले
द्‌वेष नाशिला, अश्रू पुसले
प्रेमाची फुलली फुले!



“मी प्रेम करायचं असं ठरवलं आहे.
द्वेषाचं ओझं मला पेलत नाही.”

मार्टिन लुथर किंग

